महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/किमान वेतन/विशेष भत्ता/२७७८८ दिनांक : २५/०८/२०२५

# परिपत्रक

**विषय :** कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना दि. ०१/०७/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीकरीता देण्यात येणाऱ्या विशेष भत्त्याच्या दराबाबत.

**संदर्भ :** १. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि. ०२/०५/२०१६.
२. परिपत्रक क्र. औसंवि/अ/किमान वेतन/०६३३६, दि. २५/०२/२०२५.

***************

प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६ दि. ०२/०५/२०१६ अन्वये, कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता असावी व कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन तसेच इतर संविधानिक देणी मिळावी यासाठी सविस्तर सुचना / निर्देश यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच वरील संदर्भ क्र. ०२ नुसार कंत्राटी कामगारांना दि. ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीकरिता किमान वेतनासोबत द्यावयाच्या सुधारीत विशेष भत्त्याचे दर कळविण्यात आले होते.

आता, कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम-१९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेल्या अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ.जुलै-डिसें/२०२५(२)/कार्या-१०/८००८ दि. ०४/०८/२०२५ अन्वये किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरीता प्रति महिना **परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.**

| अ.क्र. | अनुसुचित उद्योगाचे नांव | परिमंडळ -१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | ३,६१४.०० | ३,६१४.०० | ३,६१४.०० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील. **सदर विशेष भत्त्याचे दर दि. ०१/०७/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीकरीता लागू आहेत.**

**दि. ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीकरीता लागू असलेले विशेष भत्त्याचे दर आणि आता, दि. ०१/०७/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीकरीता लागू केलेले विशेष भत्त्याचे दर हे समान असल्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम देण्याची आवश्यकता नाही.**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee_Portal_Circular_I.R.Dept. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-
१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

D:\SSPisey 3\MINIMUM WAGES/Kiman Vetan.docx